Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL

Volume - XI, Issue - II
April - June - 2022
MARATHI

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | वर्तमानकाळात चीनचे विस्तारवादी धोरण आणि भारत<br>**प्रा. धप्पाधुळे रामेश्वर शंकरराव** | ६०-६४ |
| १४ | कौटिल्य नीतीवर आधारित भारताचे परराष्ट्र धोरण<br>**डॉ. तेजस्विनी गणपतराव कुलकर्णी** | ६५-६७ |
| १५ | भूराजनीतीक संकल्पना, मूलभूत तत्वे, आणि जागतिक पर्यावरणजागृती विषयक आढावा<br>**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार** | ६८-७३ |
| १६ | संयुक्त पुरोगामी आघाडी शासन काळातील भारतीय परराष्ट्र धोरणातील भारत-अमेरिका संबधाचा आढावा<br>**डॉ. बाळासाहेब बजरंग सरगर** | ७४-७६ |
| १७ | पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या काळातील परराष्ट्र धोरण भारत व चीन संबंधात सहकार्य आणि आव्हाणे<br>**प्रा. डॉ. टी. एम. पाटील** | ७७-७९ |
| १८ | भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्कालीन भारतीय नेतृत्वाचा प्रभाव<br>**प्रा. निलंगेकर एस. एस.** | ८०-८२ |
| १९ | पंडीत जवाहरलाल नेहरूची विदेशनिती<br>**प्रा. डॉ. एन. आर. कऱ्हाके** | ८३-८५ |
| २० | मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन: सातत्य किंवा बदल<br>**डॉ. गजानन बनचरे** | ८६-९४ |
| २१ | पंडित नेहरू यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार: एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. शंकर लेखणे** | ९५-९९ |
| २२ | भारताच्या परराष्ट्र धोरण निर्मितीमधील पंडित नेहरू यांचे योगदान<br>**बांगर आकाश शेषराव** | १००-१०४ |
| २३ | २०१४ ते २०१९ या काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप<br>**प्रा. डॉ. विनोद राठोड** | १०५-१०८ |
| २४ | भारताचे परराष्ट्रीय धोरण: आवलोकन<br>**डॉ. दयाराम द. मस्के** | १०९-११७ |





Scanned with CamScanner

# २१. पंडित नेहरू यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार: एक दृष्टिक्षेप

**डॉ. शंकर लेखणे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर.

## प्रस्तावना

राज्याचे संरक्षण, राज्यातील शांतता व राज्याचा विकास या सर्वांच्या दृष्टीने त्या राज्याचे परराष्ट्र विषयक धोरण अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे अगदी प्राचीन काळापासून परराष्ट्र धोरण कसे असावे याविषयी विचार मांडलेले दिसून येतात, कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात राज्याच्या परराष्ट्र धोरणासंबंधी मंडल सिध्दांत मांडून राज्या-राज्यातील संबंध कसे असावेत हे स्पष्ट केले आहे. आधुनिक भारताच्या परराष्ट्र धोरणविषयक विचारांचा अभ्यास करताना भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे विचार अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रदीर्घ काळापर्यंत त्यांनी देशाचे नेतृत्व केले होते, आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ही त्यांना ओळखले जाते. पंतप्रधान पदाबरोबर नेहरूंनी परराष्ट्र संबंध मंत्रालयाचा कारभार ही त्यांच्याकडेच ठेवला होता. त्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाची पायाभरणी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची भूमिका निश्चित करण्यात त्यांचा वाटा महत्त्वाचा असलेला दिसून येतो . 'एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारताचा उदय 1947 मध्ये झाला असला, तरी भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलतत्वे स्वातंत्र्यलढ्याच्या काळातच निश्चित झाली होती. स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण कोणत्या स्वरूपाचे असावे यासंबंधीची चर्चा स्वातंत्र्यपूर्वकाळात काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये होत असे. अशा प्रकारचे काही ठरावही काँग्रेसने केले होते. परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्वकाळात सर्वात महत्त्वाचा ठराव 1936 च्या हरिपूर काँग्रेसमध्ये करण्यात आला. या ठरावानुसार "भारतीय लोक शेजारी राष्ट्रांशी आणि इतर राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण आणि शांततामय संबंध ठेवून राहू इच्छितात चिरस्थायी जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी साम्राज्यवाद आणि एका मानवी समूहाकडून दुसऱ्या मानवी समूहाची होणारी पिळवणूक थांबणे आवश्यक आहे" असे प्रतिपादन करण्यात आले होते. त्यामुळे पंतप्रधान झाल्यानंतर पंडित नेहरू यांनी जागतिक शांतता व सहकार्य, स्वातंत्र्याचा पुरस्कार, वसाहतवाद व साम्राज्यवाद यांना विरोध, राष्ट्रा-राष्ट्रातील मैत्रीपूर्ण संबंध ही तत्वे विचारात घेऊन भारताचे परराष्ट्र धोरण निश्चित केलेले दिसून येते.

## शोधनिबंधाचा उद्देश

प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या परराष्ट्र विषयक धोरणांचा अभ्यास करणे आहे. त्याचबरोबर त्यांच्या विचारांचा भारताच्या परराष्ट्र संबंधांवर काय परिणाम झाला आहे हेही जाणून घेण्याचा प्रयत्न आहे.



Scanned with CamScanner

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध वर्णनात्मक पध्दतीने लिहिलेला असून त्यासाठी तथ्यसंकलनाच्या दुय्यम साधनांचा अवलंब करण्यात आला आहे, ज्यात प्रामुख्याने मराठी विश्वकोश, समाज विज्ञान कोश व विषयाशी संबंधित ग्रंथांचा समावेश आहे.

संकल्पना स्पष्टीकरण

सर्वसाधारण पणे परराष्ट्र धोरण म्हणजे,'राज्याची, इतर राज्याच्या संबंधात वर्तणूक ठरविणारी, राज्याच्या महत्वाच्या हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करणारी तत्त्वे निश्चित करण्याची आणि त्यांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया म्हणजे परराष्ट्र धोरण होय.' देशाचे परराष्ट्र धोरण हे अनेक घटकांवर अवलंबून असते काही स्थायी असतात तर काही तत्कालीन व तात्पुरत्या स्वरूपाचे असतात, हे सर्व घटक परस्परांवर परिणाम परिणाम करणारे असतात. ब्रेचर यांच्या मते, 'भौगोलिक स्थिती, जागतिक परिस्थिती राजकीय नेतृत्व आर्थिक आणि लष्करी स्थिती तसेच लोकमत हे परराष्ट्र धोरण निश्चित करणारे घटक आहेत.' पेडलफोर्ड लिंकन यांनी ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय संस्था, आर्थिक गरजा, भौगोलिक परिस्थिती, राष्ट्राच्या आकांक्षा, सत्ता आणि राष्ट्राने स्वीकारलेली मूल्ये यांचा समावेश परराष्ट्र धोरणाच्या घटका मध्ये केला आहे.

1946 आली भारतात हंगामी सरकारची स्थापना झाली त्यावेळी सत्ता ग्रहण केल्यानंतर थोड्याच दिवसांनी 2 सप्टेंबर1946 रोजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी केलेले वक्तव्य हे सुद्धा भारताचे परराष्ट्र धोरण स्पष्ट करणारे होते. नेहरू म्हणाले होते, "जागतिक शांतता आणि स्वातंत्र्य यासाठी इतर राष्ट्रांशी निकटचे आणि प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करता येतील अशी आम्ही आशा बाळगतो. जगामध्ये परस्पर विरोधी असे जे राजकीय गट निर्माण झाले आहेत त्यापासून शक्यतो अलिप्त राहण्याचे आमचे धोरण आहे. कारण अशाच प्रकारच्या राजकीय गटामुळे यापूर्वी जागतिक युद्धे झाली आणि यापुढे त्याहून भयानक युद्ध होऊ शकेल वसाहतवादापासून आणि पारतंत्र्यातून सर्व देश मुक्त व्हावेत आणि जगातील सर्व वंशांच्या लोकांना विकासाची समान संधी मिळावी याबद्दल आम्हाला विशेष आस्था आहे. जगात शत्रुत्व, द्वेष आणि अंतर्गत संघर्ष असूनही जगात अटळपणे सहकार्याच्या दिशेने आणि जागतिक सुराज्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. स्वतंत्र भारत अशा जागतिक ऐक्यासाठी कार्य करेल, जिथे मुक्त मानवी समूहांमध्ये परस्पर सहकार्य आहे आणि कोणताही वर्ग किंवा गट दुसऱ्याची पिळवणूक करत नाही." यावरून पंडित नेहरू यांची परराष्ट्र धोरणविषयक विचारांची संकल्पना स्पष्ट होते.

आशय विश्लेषण

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी जगामध्ये दोन महासत्ताही उदयास आल्या होत्या, अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोन महासत्ता आपले लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी प्रयत्नशील होत्या. त्यादृष्टीने अमेरिकेने नाटो, सेंटो, सियाटो यासारख्या लष्करी करार संघटनाची निर्मिती केली तर सोव्हिएत



Scanned with CamScanner

रशियाने त्यास प्रत्युत्तर म्हणून वॉर्सा करार केला. एकंदरीत जग शस्त्रास्त्रसज्ज अशा दोन गटात विभाजित विभाजित होत होते आणि यामुळे जागतिक शांततेलाही धोका निर्माण झाला होता.भारताचे शेजारी राष्ट्र पाकिस्तान हे अमेरिकेच्या गटात सामील झाले अशावेळी भारत एखाद्या गटात सामील झाला असता तर भारतीय उपखंड शांततेत राहिले नसते त्यामुळे पंडित नेहरू यांनी कोणत्याही गटात सामील न होता अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले. आणि हेच भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मध्यवर्ती सूत्र मानले जाते. अलिप्तता म्हणजे,"कोणत्याही लष्करी गटात सामील न होता एक स्वतंत्र शक्ती म्हणून आंतरराष्ट्रीय शांतता शांतता आणि सहकार्यासाठी कार्य करणे होय." 1954 मध्ये कोलंबो येथील परिषदेत नेहरूंनी आपले अलिप्ततावादी धोरण जाहीर केले. इंडोनेशिया, इजिप्त, युगोस्लाव्हिया आणि ब्रम्हदेश या राष्ट्राच्या सहकार्याने सहकार्याने भारताने सुरु केलेल्या अलिप्ततावादी चळवळीने पुढे जागतिक स्तरावर व्यापक स्वरूप प्राप्त केले.रा.शा. मोरखंडीकर यांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या परराष्ट्रीय धोरणसंबंधी नोंदविलेले मत महत्वाचे आहे ते म्हणतात, 'स्वातंत्र्योत्तर काळात प्रामुख्याने संयुक्त राष्ट्रात ठराव संमत करून घेऊन इंडोनेशिया ट्युनिशिया, मोरॉक्को, अल्जीरिया इत्यादी आफ्रिकी आशियाई देशांच्या मुक्तीसाठी वातावरण तयार करण्यात भारताने उल्लेखनीय कामगिरी बजावली. या भूमिकेतूनच 1956 मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांनी यासंबंधी केलेल्या सैनिकी हस्तक्षेपास भारताने विरोध केला, वसाहतींना स्वातंत्र्य मिळावे असा एक ठराव संयुक्त राष्ट्राने करून त्याची अंमलबजावणी कितपत होते, हे पाहण्यासाठी एक 24 सदस्यांची समिति समिती नेमली होती, भारत हा या समितीचा प्रमुख सदस्य आहे.वसाहतवादाप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेतील वंशभेदाविरुद्ध जागतिक लोकमत संघटित करण्यासाठी भारताने खूप प्रयत्न केले आहेत.' यावरून असे दिसून येते की, जागतिक शांतता टिकून रहावी यासाठी भारताचे पंतप्रधान म्हणून पंडित नेहरूंनी केलेले प्रयत्न महत्वपूर्ण आहेत.

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या दोन्ही महासत्ताच्या गटात सामील न होता त्यांच्यासोबत मैत्रीपूर्ण व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा नेहरूंनी सातत्याने प्रयत्न केला.1962 मध्ये भारतावर चीनने जेंव्हा आक्रमण केले, त्यावेळी अमेरिकेने भारताला राजकीय पाठिंबा तर दिलाच परंतु त्याचबरोबर लष्करी मदतही केली.त्याचबरोबर सोव्हिएत संघ सुद्धा भारताच्या अलिप्ततावादी धोरणामुळे सुरुवातीला साशंक होता परंतु 1950 नंतर भारताचा वसाहतवादी धोरणाला असलेला विरोध आणि चीनमधील साम्यवादी राजवटीला दिलेली मान्यता यामुळे सोव्हिएत संघाचा गैरसमज दूर होऊन मैत्रीपूर्ण संबंधास सुरुवात झाली, त्यामुळेच 1962 च्या भारत चीन युद्धात सोव्हिएत संघाचा पाठिंबा भारताला मिळाला होता.त्याचबरोबर त्यांच्याच मदतीने मिग 21 या लढाऊ विमानांचे उत्पादन भारताने हाती घेतले. यावरून हे दिसून येते की दोन्ही महासत्ताच्या गटात सहभागी न होताही नेहरूंनी दोन्ही महासत्तासोबत सहकार्य व मैत्रीचे संबंध निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न केला होता.



Scanned with CamScanner

पंडित नेहरूंच्या परराष्ट्र विषयक धोरणातील एक उल्लेखनीय योगदान म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर शांततामय सहजीवन व सहकार्यासाठी त्यांनी केलेला पंचशील तत्वांचा स्वीकार. 1954 मध्ये पंडित नेहरू आणि युगोस्लाव्हियाचे तत्कालीन पंतप्रधान टिटो तसेच इजिप्तचे पंतप्रधान नासीर यांनी काढलेल्या संयुक्त पत्रकात पंचशील तत्त्वाचा स्वीकार केला. पंचशील तत्त्वातील पाच तत्वे म्हणजे 1) परस्परांच्या प्रादेशिक एकात्मतेबद्दल आणि सार्वभौमत्वाबद्दल आदर बाळगणे. 2) परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे. 3) दुसऱ्या राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे. 4) राष्ट्रीय समता आणि परस्परांचे हीत पाहणे. 5) शांततामय सहजीवन आणि आर्थिक सहकार्य या तत्त्वांचा स्वीकार करणे. भारत आणि चीन यांच्या करारात सर्वप्रथम या पंचशील तत्त्वांचा स्वीकार करण्यात आला. परंतु चीनने 1962 साली भारतावर आक्रमण करून या तत्वांचा भंग केला.परंतु भारताने मात्र या तत्त्वांचा त्याग केला नाही. चीनने तिबेटवर केलेल्या आक्रमानानंतरही भारताने त्यात हस्तक्षेप केला नाही किंवा विरोधही केला नाही, चिनसोबत चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु तिबेटचे धर्मगुरु दलाई लामा यांना राजाश्रय दिला. या दुटप्पी धोरणामुळे पंडित नेहरू यांच्यावर टीकाही केली जाते. ब्रिटिश राजवटीपासूनच चिनसोबत सिमरेषेबाबत गुंतागुंतीचे व संघर्षाचे संबंध राहिले आहेत, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही चीनने लडाखच्या भागातील अक्साई चीन प्रदेशातील भूभागावर रस्ता बांधला, भारताच्या 50 हजार चौरस मैल प्रदेशावर दावा सांगितला, त्याचबरोबर 1962 साली भारताच्या नेफा अर्थात सध्याच्या अरुणाचल प्रदेशातील भागात लष्करी आक्रमण करून मोठ्या प्रदेशावर ताबा मिळवला. त्यामुळे नेहरूंचे चीन बाबतचे धोरण अपयशी ठरले अशी टीका केली जाते. तिबेटवरील आक्रमणाचा विरोध न केल्यामुळे भारताने एक 'बफर' प्रदेश गमावला.भारत आणि चीन यांच्यातील जॉन्सन रेषा आणि म्याकमहॉन सीमारेषा मान्य नाहीत, हे नेहरूंना माहीत असूनही केवळ राजनयिक मार्गाने तोडगा निघेल या आशेवर ते राहिले व सीमांच्या संरक्षणकडे व लष्करी तयारीकडे दुर्लक्ष झाले, अशी टीका केली जाते.

1947 साली भारत आणि पाकिस्तान यांच्यात अनेक मुद्यावर तणावाचे संबंध होते, काश्मीरचा प्रश्न वगळता नद्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न नेहरूंनी तडजोडीच्या मार्गाने मिटविण्यात यश मिळवले. 1960 मध्ये जागतिक बँकेच्या प्रयत्नातून या दोन देशात करार झाला आणि या करारानुसार रावी, बियास आणि सतलज या नद्यांचे पाणी पाकिस्तानला देण्याचे भारताने मान्य केले.परंतु 1962 च्या युद्धानंतर पाकिस्तान चीन यांच्यातील वाढत गेलेली मैत्री,पाकव्याप्त काश्मीरचा काही भाग परस्पर चीनला देणे, 1965 चे भरतासोबतचे युद्ध आणि काश्मीरचा प्रश्न यामुळे नेहरूंनी चांगले संबंध निर्माण करण्यासाठी प्रयत्न करूनही पाकिस्तान सोबतचे संबंध चांगले होऊ शकले नाहीत.

पंडित नेहरूंनी आशियायी राष्ट्रांशी विशेष निकटचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले,1947 ते 1949 या काळात आशियायी राष्ट्राच्या परिषदा भरऊन व्हिएतनाम, कोरिया या देशातील प्रश्न शांततामय शांततामय मार्गाने सुटावेत यासाठी प्रयत्न केले. इंडोनेशिया सारख्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्न



Scanned with CamScanner

प्रयत्न केले. एकंदरीत नेहरूंनी नेहमीच जागतिक शांतता आणि सहकार्य यांना महत्त्व देऊन भारताचे परराष्ट्रीय धोरण निश्चित करण्याचा प्रयत्न केला होता.

निष्कर्ष

'शांतता, मैत्री आणि विश्वबंधुत्व यांचा राजकीय व सांस्कृतिक वारसा भारताला लाभलेला आहे.त्यामधूनच भारताच्या अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाचा उगम झाला'. असे मत स.मा.गर्गे यांनी भारतीय समाज विज्ञान कोशात व्यक्त केलेले आहे. त्यानुसार पंडित नेहरू यांचे परराष्ट्रीय धोरणासंबंधीचे विचार अभ्यासल्यानंतर असे दिसून येते की, नेहरूंनी अलिप्ततावादी धोरण स्वीकारल्यामुळे अनेक राष्ट्रांना महासत्ताच्या गटापासून वेगळे राहता आले, त्यांना तिसरा पर्याय उपलब्ध झाला. जागतिक पातळीवर शांततामय सहजीवन आणि सहकार्य वाढविण्यासाठी पंचशील तत्वांची निर्मिती केली. हे नेहरूंनी दिलेले योगदान मौलिक स्वरूपाचे आणि शाश्वत आणि शांततामयपणे विकासाचा मार्ग दाखविणारे आहे. त्यांनी आपल्या धोरणातून जागतिक पातळीवर वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशभेदाला विरोध केला, ज्यातुन त्यांच्या व्यापक उदारमतवादी दृष्टिकोनाचे आणि मानवतावादी विचाराचे दर्शन होते.

संदर्भ

1. किशोर बेडकिहाळ, संपादक, वेध नेहरू विश्वाचा, शब्द पब्लिकेशन,2015
2. कऱ्हाडे स.दा., पंडित नेहरू आणि अमेरिका, पंडित नेहरू व्यक्ती आणि कार्य,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,2002
3. रघुनंदन वराडकर, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर,1991
4. रा. शा. मोरखंडीकर, भारताचे परराष्ट्रीय धोरण, मराठी विश्वकोश.
5. वासंती रासम, करिअप्पा खापरे, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर,2007
6. शांताराम भोगले, भारताचे परराष्ट्र धोरण, विद्या प्रकाशन, नागपूर,1992
7. स. मा.गर्गे (संपादक), भारतीय समाज विज्ञान कोश, खंड 3 मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2007.

Scanned with CamScanner